**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:31.05.2026** **वारः रविवार**

**ठळक बातम्या,**

**१ ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कर सज्ज- लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदींचं प्रतिपादन**

**२ मराठा आरक्षणाविषयी सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचं  मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन. मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित.**

**३ पुणे विषारी दारू प्रकरणातल्या मृतांचा आकडा २२वर, भिवंडीतील कारखान्याचे धागेदोरे हाती.**

**४ सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, सात्विक साईराज रँकी रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडी अंतिम फेरीत**

**आणि**

**५ आयपीएलमध्ये अहमदाबाद इथं आज गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात विजेतेपदासाठी लढत.**

**आता सविस्तर बातम्या,**

**एनडीए-द्विवेदी**

भारतीय सशस्त्र दलं सर्वोच्च कार्यवाहीसाठी सज्ज आहेत. परिस्थितीनुरूप लष्करी कारवाईची गरज भासली तर ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कराची सज्जता असल्याचं प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल केलं.

पुण्याच्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी म्हणजे एनडीएच्या दीडशेव्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा काल पार पडला. या तुकडीत १८ महिला कॅडेटस् सह ३५३ कॅडेटस्नी आपलं प्रशिक्षण पूर्ण केलं. या समारंभाला संबोधित करताना जनरल द्विवेदी बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारत कोणत्याही चिथावणीला अचूक आणि दृढनिश्चयानं प्रत्युत्तर देण्यास सक्षम असल्याचं सिद्ध झालं आहे. देशासमोरील नव्या सुरक्षिततेच्या आव्हानांना कशा प्रकारे प्रतिसाद द्यावा, याचा आदर्श ऑपरेशन सिंदूरनं प्रस्थापित केल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. उत्तीर्ण झालेल्या कॅडेट्सना व्यावसायिकता, नेतृत्वगुण आणि राष्ट्रसेवेचे सर्वोच्च मापदंड कायम राखण्याचं आवाहन केलं.

**सीडीएस**

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान हे काल सेवानिवृत्त झाले. दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारक इथं तिन्ही दलांकडून त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. त्यानंतर त्यांनी युद्धस्मारकावर पुष्पचक्र वाहीलं. देशाचे सर्वोच्च लष्करी अधिकारी म्हणून त्यांच्या गौरवशाली कार्यकाळाची काल सांगता झाली. यावेळी तीनही दलांकडून गार्ड ऑफ ऑनर स्विकारून सेवेतून निवृत्त होणं ही अभिमानाची, सन्मानाची बाब असल्याचं चौहान यांनी नमूद केलं. चार दशकांच्या प्रदीर्घ लष्करी सेवेच्या काळात त्यांना परम विशिष्ट सेवा पदक, अतिविशिष्ट सेवा पदकांसारख्या सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.

**मराठाआरक्षण-२५जालना**

मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेताना सरकार सकारात्मक असून, दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल असं कोणतंही काम सरकार करणार नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. काल यासंदर्भात बोलताना ते म्हणाले....

बाईट 49 सेंकंद

**आंदोलन**

दरम्यान, मराठा नेते मनोज जरांगे यांनी काल मध्यरात्री आपलं उपोषण स्थगित केलं आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या सविस्तर आणि सकारात्मक चर्चेनंतर जरांगे यांनी हा निर्णय घेतला. सातारा गॅझेटच्या आधारे निर्णय करण्यासाठी सरकारला एक महिन्याचा वेळ देण्यात आला आहे. यानंतर मंत्री राधाकृष्ण विखेपाटील आणि आमदार प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत हे उपोषण स्थगित करण्यात आलं.

**घनकचरा**

नागपूरमधील भांडेवाडी परिसरातील देशातल्या पहिल्या एकीकृत शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या प्रकल्पाच्या माध्यमातून एक हजार २०० मेट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यातून प्रतिदिन २८ टन वायूची निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात येणार असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. खाजगी भागीदारीतून हा प्रकल्प उभारण्यात आला असून, केवा सुस बडे या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहाच्या सहकार्याने हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या वेळी मुख्यमंत्र्यांसह  महसूल मंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसंच इतर मान्यवर व्यक्तींसह संबंधित अधिकारीही उपस्थित होते.

**मकीबा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मन की बातच्या १३४ व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. सकाळी अकरा वाजता याचे थेट प्रसारण होईल. आकाशवाणी, दूरदर्शनची सर्व केंद्र आणि यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन एआरआर ॲपवरून मन की बात ऐकता येणार आहे.

हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे....

**पुणे विषारी दारू**

पुणे विषारी दारू प्रकरणातल्या मृतांची संख्या २२ वर पोहोचली असून, या प्रकरणात १० जणांना अटक करण्यात आली आहे. मृतांमध्ये पुण्यातले ७, पिंपरी चिंचवड आणि ऊरळी कांचनमधल्या १४ जणांना समावेश आहे. याप्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याच्या आरोपावरून पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या २२ जणाचं निलंबन करण्यात आलं असून,

त्यामध्ये ९ पोलीस कर्मचाऱ्यांचा आणि १३ राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा तपास आता सीआयडी अर्थात गुन्हे अन्वेषण विभागाकडे देण्यात आला आहे.

**भिवंडी मिथेनॉल**

दरम्यान, या प्रकरणाचा संबंध भिवंडीतील एका कंपनीशी असल्याचे उघड झाले आहे. या विषारी दारूसाठी वापरण्यात आलेले मिथेनॉल भिंवडीतील रेक्स इंटरनॅशन कंपनीतून पुरवण्यात आल्याचं स्पष्ट झालं आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील या कंपनीवर काल अन्न आणि औषध प्रशासनानं छापा टाकत धडक कारवाई केली. प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार करण्यात आलेल्या या कारवाईत मिथेनॉलचा अंदाजे सहा हजार किलो साठी जप्त करण्यात आला. या साठ्याची अथवा त्याच्या खरेदी विक्रीची कोणतीही अधिकृत नोंद आणि व्यवहारांचा तपशील कंपनीत उपलब्ध नाही.

**नशामुक्त महाराष्ट्र**

जून महिन्याच्या २५ तारखेपासून राज्यभरात नशामुक्त महाराष्ट्र अभियान राबवण्यात येणार असून, सर्व लोकप्रतिनिधी, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा असं आवाहन, मंत्री आशिष शेलार आणि मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केलं आहे. मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीची बैठक काल दूरदृश्य प्रणाली द्वारे पार पडली. बैठकीत मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांच्यासह १६० मान्यवर उपस्थित होते.

**तपासणी अन्न औषध मोहिम**

नागरिकांना दर्जेदार आणि पोषक खाद्य पदार्थ मिळावेत यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने मुंबई जिल्ह्यात विशेष तपासणी मोहिम हाती घेतली आहे. अन्न आणि औषध प्रशासनाने पाच ठिकाणी टाकलेल्या छाप्यात एक लाखाहून अधिक किंमतीचा संशयास्पद अन्नपदार्थांचा साठा जप्त केल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनाचे सहआयुक्त ज्ञानेश्वर तांबोळी यांनी काल दिली.

**कापूस आयात सीमाशुल्क**

केंद्रसरकारनं पुढील पाच महिन्यांच्या कालवधीसाठी म्हणजेच ऑक्टोबर महिन्यापर्यंत कापसाच्या आयातीवरील सीमा शुल्क माफ केलं आहे. वस्त्रोद्योग मंत्रालयानं या संदर्भात एक अधिसूचना जारी केली असून, उद्यापासून तत्काळ ही माफी लागू होणार आहे. देशातल्या वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी आणि कापूस उत्पादक शेतकरी, कापूस मूल्य साखळीचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारनं हा निर्णय घेतल्याचं अधिसूचनेत नमूद केलं आहे. हंगामाव्यतिरिक्त लागू होणाऱ्या या माफीमुळे वस्त्रोद्योगासाठी कापसाची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित होणार आहे.

**<u>फार्मरग्रुपलीग-३२यवतमाळ५</u>**

यवतमाळ जिल्ह्यातील हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांच्या गटासाठी आगळीवेगळी फार्मर ग्रुप लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १० जून ते १० ऑगस्ट या दोन महिन्यांच्या कालवधीत पार पडणार आहे. मृदा आणि बीज व्यवस्थापन, पीक पद्धती आणि शेती तंत्रज्ञान, जैविक खते आणि कीड रोग व्यवस्थापन, क्षमता बांधणी, प्रसार आणि तंत्रज्ञान वापर हे चार टप्पे यामध्ये असतील.

**<u>बँडमिंटन</u>**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, भारतीय पुरुष दुहेरीची जोडी सात्विक साईराज रँकी रेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या दक्षिण कोरियाच्या जोडीचा त्यांनी २१-१९, २१-१८ अशा गुणांनी काल पराभव केला. उपांत्य फेरीचा  दुसरा सामना इंडोनेशिया आणि चीन यांच्यात होणार असून या सामन्यातील विजेत्याशी भारतीय जोडीचा सामना होणार आहे. भारताच्या मिश्र दुहेरीच्या जोड़ीला जपानच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

**<u>आयपीएल क्रिकेट</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज संध्याकाळी अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादरम्यान विजेतेपदाची लढत होणार आहे. गुजरातनं राजस्थान रॉयल्सवर शुक्रवारी मात केली होती.

**<u>मोसमी पाऊस</u>**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, येत्या चार ते पाच दिवसांत नैऋत्य मोसमी पावसाची केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागात पुढे वाटचाल सुरू होण्याची शक्यता आहे. मोसमी पावसाच्या वाटचालीसाठी अनुकूल वातावरण तयार होत असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि वीजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून विदर्भात तुरळक ठिकाणी गारा पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या,

१ ऑपरेशन सिंदूरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लष्कर सज्ज- लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदींचं प्रतिपादन

२ मराठा आरक्षणाविषयी सरकारची भूमिका सकारात्मक असल्याचं  मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन. मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित.

३ पुणे विषारी दारू प्रकरणातल्या मृतांचा आकडा २२वर, भिवंडीतील कारखान्याचे धागेदोरे हाती.

४ सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, सात्विक साईराज रँकी रेड्डी आणि चिराग शेट्टी जोडी अंतिम फेरीत

आणि

५ आयपीएलमध्ये अहमदाबाद इथं आज गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात विजेतेपदासाठी लढत.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**